जा.क्र.जिपगो/एसटी-सीईओगों/ 71 /२०१८
कार्यालय : जिल्हा परिषद, गोंदिया
दिनांक :- १९.०७.२०१८

आदेश

प्रति,

अध्यक्ष/सचिव
म.रा.जि.प.कर्म.महासंघ
जिल्हा शाखा गोंदिया

विषय :- दिनांक ७,८ व ९ ऑगष्ट २०१८ रोजी होणाऱ्या राज्यव्यापी संपाची नोटीस स्विकारण्या करीता महासंघास वेळ देण्याबाबत.

संदर्भ - आपले वरील विषयाचे दिनांक - १८/०७/२०१८ रोजीचे पत्र

वरील संदर्भीय विषयाचे आपले निवेदन/पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. याव्दारे आपणास कळविण्यात येत आहे की, सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन,यांचे दिनांक ०२/०१/२०१७ चे शासन निर्णयानुसार सदर संघ मान्यता प्राप्त नसल्याने आपल्या निवेदनावर विचार करता येणार नाही.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा कायदयानुसार सर्व शासकीय कर्मचारी संपावर जाणे प्रतिबंध असल्याने, या आदेशाचे उल्घंन करुन संपावर गेल्यास संपात सहभागी होणारे आपल्या संघटनेतील कर्मचारी विरुध्द कडक योग्य कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यात येईल. यानंतर होणारे परिणामास संघटनेतील संपात सहभागी होणारे कर्मचारी स्वत: सर्वस्वी जवाबदार राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया.

प्रतिलीपी -१) मा.सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, नागपुर विभाग,नागपुर यांना माहितीस्तव सादर.
३) जिल्हा परिषद बेदसाईटवर प्रशिध्दीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया.